# ओळख : भारतीय निसर्ग– पर्यावरण पत्रकारितेची :

## निसर्ग आणि पर्यावरणाविषयीच्या  प्रसार माध्यमांच्या जाणिवा समृद्ध करणारा ग्रंथ

निसर्ग आणि पर्यावरण हे शब्द आपल्या दैनंदिन जीवनात सतत डोकावत असतात.अगदी आपल्या परिसरातील स्वच्छता   असो नाहीतर पश्चिम घाटासंबंधी डॉ गाडगीळ यांचा अहवाल असो. जैववैविध्य,वन्यजीवन तस्करी, ,धारणाक्षम विकास हे शब्द आपल्याला सतत भेटत असतात. आणि वाचकांना भेटण्या आधी ते माध्यमात काम करणाऱ्या पत्रकारांना भेटत असतात.  अर्थकारण,समाजकारण,राजकारण  अशा वैविध्यपूर्ण घटनांचा रोजचा हा कोसळणारा धबधबा सांभाळताना विशिष्ट विषयातील पारंगतता मिळवणे.आणि उपलब्ध असलेल्या थोडया वेळात त्या संबंधीच्या महत्त्वाच्या घटनांचा अन्वयार्थ लावणे प्रत्येकाला शक्य होतेच  नाही , पुणे,मुंबई सारखी मोठी शहरे सोडली तर छोटया गावांत स्थानिकमाध्यमांना विश्वासार्ह संदर्भ उपलब्ध होताना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. निसर्ग आणि पर्यावरण विषयकअनेक संकल्पनांचा आणि विशेषतः त्या संबंधीच्या पत्रकारितेत त्याचे वार्तांकन करताना येणारया अडचणी लक्षात घेऊन  पर्यावरण अभ्यासकश्री. संतोष शिंत्रे यांनी एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला आहे. नाव आहे : **ओळख –भारतीय निसर्ग– पर्यावरण पत्रकारितेची** . पर्यावरण हा विषय गेली काही दशकं आपल्या पत्रकारितेमधे.कॉरपोरेट जगामधे आणि  सेवाभावी संस्थांच्या कार्यकक्षांचा एकमहत्वपूर्ण भाग बनला आहे. या सर्वांची गरज लक्षात घेऊन तयार झालेला हा ग्रंथ हा केवळ भारतीय नाही तर आशियाई देशांच्या प्रकाशन जगात एकपहिला वहिला असा सुधारित प्रयत्न आहे. आणि हे लक्षात घेतले तर या पुस्तकाचे मूल्य आपल्या सर्वांच्याच लक्षात येईल.

सध्याच्या माध्यम क्षेत्रात निसर्ग आणि पर्यावरण हा विषय दुर्दैवाने फारसा अग्रक्रमाने समोर आणला जात नाही. कारण पत्रकारांसाठी आणि नागरिकांसाठी असे तगडे संसाधनच उपलब्ध नव्हते.

पण आनंदाची बाब म्हणजे पुढच्या दोन महिन्यात सकाळ प्रकाशन तर्फे या ग्रंथाची इंग्रजी आणि मराठी आवृत्ती एका पाठोपाठ प्रकाशित होत आहे

मोटारी,फॅशन या विषयापासून ते रिअल इस्टेट,सिनेमा या विषयांच्या पुरवण्या आपण पहातो पण  निसर्ग आणि पर्यावरणाला वाहिलेली पुरवणी आपल्याला सहसा आढळत नाही. शिवाय या महत्त्वाच्या विषयावरील बातम्याही तुलनेनं फार कमी प्रमाणात येतात. उपलब्ध आकडेवारीनुसार केवळ १.५% एवढी जागा वृत्तपत्रात पर्यावरण विषयक बातम्यांना उपलब्ध होते तर टीव्ही माध्यमात हे प्रमाण ०.३५ % एवढे आहे. दरवर्षी सुमारे ५० हजार कोटी रूपयांच्या धनसंपदेची  आपल्या देशाच्या उत्पन्नात भर टाकणाऱ्या या मौल्यवान नैसर्गिक संपत्तीबद्दलची आपली ही उदासीनता अतार्किक आहे.

आजही  आपल्याला पर्यावरण विषयक माहिती ही टीव्ही माध्यमातून सर्वात जास्त  मिळते तर  त्याच्या खालोखाल वृत्तपत्रे आणि  नियतकालिकातून ,आणि नंतर इंटरनेट आणि  रेडिओ या माध्यमातून मिळते.

संबंधित क्षेत्रातील पत्रकारांना या पुस्तकाच्या माध्यमातून ही माहिती  सजगपणे समजून घेण्यास मदत तर होईलच  शिवाय आपले वार्तांकन,लेख,भाष्य, संपादकीय टिपणी अधिक समृद्ध करता येईल.

संतोष शिंत्रे यांचे पर्यावरण आणि समाज यांचा समग्र विचार करून लिहिलेले हे पुस्तक म्हणजे माध्यमात काम करणाऱ्या पत्रकारांसाठी आणि विशेषतः पर्यावरणा सारख्या समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या महत्त्वपूर्ण अशा विषयात काम करणारया सर्वांसाठीच एकअनमोल दस्त ठरावा. या पुस्तकाची रचनाही एक विशिष्ट उद्‌देश डोळयासमोर ठेवून केली असल्यामुळे त्याला एकसूत्र आहे. त्यामुळे हे पुस्तक अभ्यासताना पत्रकारांना पर्यावरणविषयक कळीचे मुद्‌दे तर नीट लक्षात येतीलच शिवाय त्यांचे वार्तांकन करताना काय काळजी घेतली पाहिजे,कोणत्या चुका टाळल्या पाहिजेत हे ही सांगितले आहे.

अध्ययन अध्यापनाच्या मूलभूत तत्त्वांचा खूप चांगला उपयोग यात केला असल्यामुळे मुद्यांचे  आकलन तर यामुळे होतेच  शिवाय प्रत्यक्ष कार्यकृतीचे स्पष्ट मार्गदर्शन ही या पुस्तकाची फार मोठी जमेची बाजू आहे.

या पुस्तकाचं महत्त्वाचे वैशिष्टय काय असा कोणी प्रश्न  विचारला तर त्याचं उत्तर देणं थोडं कठीण आहे कारण यातील सारेच विषय आपल्या जिव्हाळयाचे आणि तपशील हा आपल्या ज्ञान कक्षा विस्तारित करणारा आहे.

पण एक गोष्ट आवर्जून सांगता येईल की हा सगळा तपशील एका अभ्यासकाच्या अथक परिश्रमातून आणि संवेदनशील अशा पर्यावरणीय तळमळीतून पुढे आता आहे. त्यामुळे हा सगळा वाचन प्रवास हा केवळ माहितीचा डोंगर आपल्यापुढे उभा करत नाही तर त्या संदर्भातील अनेकअज्ञात अशा मुद्यांचा ऐवज आपल्यापुढे ठेवतो. निसर्ग पर्यावरण ,संरक्षण संवर्धनात माध्यमे,सामाजिक संस्था आणि नागरिक यांची कृतीशील सतर्कता वाढावी हा या संदर्भ ग्रंथाचा मुख्य उददेश आहे. यात लेखकाने काय करायला हवे याचा केवळ पाढा न वाचता ते कसे करायला हवे याचे उद्‌बोधक विवेचन केलेले आहे. केवळ समस्यांची उरफोडी चर्चा आणि त्यातून केवळ उद्‌वेग पसरवणारया साहित्याचा ,ग्रंथांचा सुकाळ असताना या पुस्तकाचे आगमन मला निसर्ग आणि पर्यावरण यांच्या प्रश्नांकडे वस्तुनिष्ठ पद्धतीने पहाण्याचा एकअभिनव प्रयत्न वाटतो.

**In nature there are neither rewards nor punishments. There are consequences.**
**-Robert Green Ingersoll ugust ul**

एकोणिसाव्या शतकातील या अमेरिकन राजकीय नेत्याचे वचन या पुस्तकाच्या पहिला पानावरच आपल्याला भेटते आणि इथेच आपल्याला लेखकाचा स्पष्ट, आणि परिणामांची चर्चा करणारा अभ्यासपूर्ण पवित्रा लक्षात येतो. नो नॉन्सेस अशी ही शैली आपल्याला पुस्ताकभर नजरेस पडते.

लेखक स्वतः मुक्त पर्यावरण पत्रकार असल्यामु‌े आणि पर्यावरण विषयांचे विविध पत्रकारिता महाविद्याालयात अध्यापन तसेच लेखन करत असल्यामुळे विषयाे नेमके महत्त्व आणि पत्रकारांना,संस्थांना या िषयातील लेखन करताना,संवाद करताना येणारया अडचणी त्यांना चांगल्या माहित आहेत. त्यामुळे या पुस्तकातील अनेक प्रकरणे ही पत्रकार मंडळीना जिव्हाळयाची तर वाटतीलच शिवाय त्यांच्या अनेक प्रश्नांची समर्पक उत्तरे यातून मिळतील .इंटरनेटच्या महाजालात माहितीचा ओघ सतत वहात असतो. आणि ही माहिती इतक्या ्रचंड प्रमाणात असते की तिचे नेमके वर्गीकरण कर‌े जिकिरीचे होऊन बसते. त्यामुळे माहितीचा विरफोट ही एक आता वेगळी समस्या होऊ पहात आहे.अशा वेळी अचूक आणि विश्वासार्ह माहिती आणि तीही खणखणीत संदर्भासह मिळणंदुरापास्त झाले होते पण या ग्रंथाने ती कसर भरून काढली आहे.

धारणाक्षम विकास ,जैववैविध्य,पाणी, भारतीय जंगले ,जमिनीचे प्रश्न आणि पर्यावरण,भारतीय वाघ आणि वन्यजीवन ,कायदे,धोरणे,शासकीय नियग आणि हवामान बदल या निसर्गातील महत्त्वपूर्ण विषयांचा सखोल उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. प्रत्येक प्रकरणानंतर त्या विषयातील अधिक संदर्भ आणि लिंक्स् देऊन अभ्यासकांना या विषयातील जास्तीजास्त परिपूर्ण माहिती मिळावी असा प्रामाणिक प्रयत्न यात दिसतो.

शिवाय ही माहिती अधिकृत आणि दुर्मीळ अशा रंगीत छायाचित्रांमुळे आपल्याला समजून घेण्यास चांगली मदत होते. माहितीपूर्ण इनफोग्राफीक्स्,नकाशे आणि पत्रकारांना वारंवार भेटणारया पर्यावरणविषयक पारिभाषिक शब्दांचे सुटसुटीत विवेचन लघुकोश या स्वरूपात दिल्यामुळे हे पुस्तक पत्रकारांना एक विशेष पर्वणी ठरावी. वरील गाभा विषयांबरोबर लेखकानी पर्यावरण चळवळ आणि राजकारण,हरित राजकारण भारताचा पर्यावरणीय जाहिरनामा ,महिला आणि पर्यावरण आणि पर्यावरणीय परिणामाचे मूल्यमापन या सारख्या विषयांची अभ्यासपूर्ण चर्चा यात केली आहे. भारतापुढचे आजचे सर्वात ज्वलंत निसर्गविषयकप्रश्न आणि पर्यावरण पत्रकारितेची मूलतत्वे ही पहिली दोन प्रकरणेही महत्त्वपूर्ण आहेत.

वने आणि त्याविषयीचे कायदे हा विभाग पत्रकारांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे या विभागात वन्यजीव संरक्षण कायदा,जैवविविधतेचे कायदे ,पर्यावरण संरक्षण विषयक कायदेशीर तरतुदी, हवा आणि पाण्याच्या प्रदुषणाबाबत असलेले कायदेशीर निर्बंध यांची अद्ययावत माहिती करून देण्यात आली आहे.पर्यावरण विषयक पत्रकारिता करताना कायद्याचे पुरेसे ज्ञान असले की अनेक बेकायदेशीर घटनांना वाचा फोडता येतेच शिवाय अशा अनिष्ट गोष्टींना आळा ही घालता येतो.

या पुस्तकात ग्रामीण आणि शहरी भागात स्त्रियांचा पर्यावरणाशी कसा जवळचा संबंध असतो याकडे लेखकाने आपले लक्ष वेधले आहे. जमिनीची मालकी तिच्याकडे जवळजवळ नसतेच. पण शेतमजूर म्हणून ती काम करताना दिसते,घरातील सरपण,जळण (लाकूडफाटा)तिलाच मिळवावे लागतो.पिण्याचे पाणी तिच भरते. पण या सर्व स्रोताच्या व्यवस्थापनात तिला काहीच भूमिका नसते.हे सांगून लेखकानी ग्रामीण वास्तवाचे दर्शन घडवले आहे.

आणि हे करत असताना पत्रकारांनी स्त्री म्हणजेच निसर्ग अशा भाबडया संकल्पनांपासून दूर राहून कळीचे मुद्दे ओळखून  वस्तुनिष्ठ पत्रकारितेची कास सोडता कामा नये असे आवर्जून सांगितले आहे. हे पुस्तक  मूलतः पत्रकारांना आपल्या दैनंदिन व्यवहारात ,वार्तांकनामधे उपयोगी पडावे या उद्देशाने लिहिले असले तरी यातील माहितीची  व्याप्ती आणि एकूणच पर्यावरणाविषयीच्या कक्षांचा यात घेतलेला विस्तृत वेध पहाता पर्यावरण विषयक  काम करणारया सेवाभावी संस्था, सजग नागरी मंच,शासकीय अधिकारी,प्राध्यापक आय. ए एस इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस आणि इतर स्पर्धा परीक्षांना बसणारया विद्यार्थ्यासाठी हे पुस्तक खूप उपयुक्त असे आहे.

संपूर्ण पुस्तक  वाचताना हे जाणवते की यात लेखकाची भूमिका तटस्थ अभ्यासकाची आहे .यात कोणतेही भावनिकआवाहन नाही की पर्यावरणाच्या ऱ्हासाचे अरण्यरुदनही नाही . खणखणीत आकडेवारी, घटनांचा वस्तुनिष्ठ तपशील आणि मुद्दे मांडण्याची एक बौदि्धक बैठक  यामुळे हे पुस्तक  आपल्याला एका समग्र पर्यावरणीय सत्याकडे घेऊन जाते. यापुढील काळात मनुष्य आणि निसर्ग यांचे नाते आपली विकासनीती आणि जीवनशैली यांच्या समतोलानेच टिकणार आहेः**हे ते सत्य** .ते एकाच वेळी ज्ञानभाषा आणि मातृभाषा यातून सामोरे आणण्याबद्दल लेखकआणि सकाळ प्रकाशन यांना दाद द्यायला हवी

**लेखकः**

**डॉ.केशव साठये**